LIFE
TRUST
changing lives
changing destinies

# ह्या दिवाळीमध्ये एका जीवनात प्रकाश पसरवा

*इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्विसेस स्कीम (आयसीडीसी) ला असलेले आपले समर्थन अधिक बळकट करण्यासाठी लाईफ ट्रस्टतर्फे एका खास उपक्रमाची सुरूवात*

**मुंबई, ऑक्टोबर 10, 2009:** ह्या दिवाळीमध्ये, नोंदणीकृत जनहितार्थ ट्रस्ट लाईफ ट्रस्ट शहरातील अनेक अल्पनशिबी लहान मुलांच्या चेहऱ्यावर मोठे हसू फुलवणार आहे. “लॅन्टर्न ऑफ लाईफ” ह्या विशेष निधी गोळा करण्याच्या उपक्रमाच्या माध्यमातून अल्पसुविधाप्राप्त मुलांच्या अधिक चांगल्या शिक्षणासाठी निधी जमा करण्याची आशा या ट्रस्टला आहे. त्याचसोबत समान विचारांच्या लोकांमध्ये ह्या कारणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचाही प्रयत्न ते करतील.

ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबईच्या नगरपाल डॉ.इंदु शाहानी, बॉलीवुड अभिनेता झायेद खान आणि लाई फ ट्रस्टच्या व्यवस्थापकीय ट्रस्टी पूनम लालवानी यांनी आज हाय स्ट्रीट फिनिक्स येथे केले.

मुंबई आणि बेंगलोरमधील लाईफस्टाईल स्टोअर्समध्ये लाईफ ट्रस्टतर्फे विशेष बनवण्यात आलेले कंदील उपलब्ध करण्यात येतील. हाय स्ट्रीट फिनिक्स येथील विशेष निर्माण करण्यात आलेल्या किऑस्क येथेही हे कंदील उपलब्ध असतील. यातून जमा करण्यात आलेला निधी केवळ भारत सरकारच्या इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्विसेस स्कीम (आयसीडीएस्) ला समर्थन देण्यासाठी वापरण्यात येईल. या कंदीलांची किंमत रू.100 असेल.

या उपक्रमाबाबत लाईफ ट्रस्टच्या व्यवस्थापकीय ट्रस्टी श्रीमती पूनम लालवानी म्हणाल्या, “बांद्रा आणि धारावी येथील 475 आंगणवाडयांसोबत लाईफ ट्रस्ट कार्यरत आहे. अनेक अभिनव शिक्षण तंत्रांची यांनी सुरूवात केलेली आहे. डीव्हीडीचा वापर करून प्रि प्रायमरी पब्लिक स्कूल शिक्षकांना इंग्लिश लर्निंग कौशल्य प्रदान करण्याचे तंत्र यातील सर्वात नवीन आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेला निधी ह्या उपक्रमांसाठी वापरण्यात येईल आणि येत्या वर्षी 9500 मुलांना याचा फायदा होईल.”

तीन डिजाईन महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये लाईफ ट्रस्टने कंदील डिजाईन स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद लाभला आणि प्रचंड मोठया प्रमाणात कंदील बनवण्यात आले. विजेते 3 कंदील ज्ञानेश्वर पोखरकर – एल्.एस्.रहेजा स्कूल ऑफ आर्ट, वरळी, आयुश्री खडतरे – सोफिया पॉलीटेक्निक, ब्रीच कॅन्डी आणि विराज काळे, एल्.एस्.रहेजा स्कूल ऑफ आर्ट, वरळी यांचे होते आणि या उपक्रमाचे ते बोधचिन्ह असतील. या उपक्रमाची सुरूवात करण्यासाठी लाईफ ट्रस्टला अतिशय अनुरूप वेळ ह्या सणासुदीच्या दिवसांनी दिली आणि मुंबईचे नागरिक अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात खरोखरीच प्रकाश पसरवू शकतील. अखेर दिपावली हा प्रकाशाचा सण आहे.

“लाईफ ट्रस्टमध्ये आमचा असा विश्वास आहे की भारतात शिक्षणाच्या समस्येबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आपण आपल्या समाजासोबत काम करायला हवे. ‘लॅन्टर्न फॉर लाईफ’ उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही मुंबईच्या नागरिकांना आमच्या या प्रयत्नांमध्ये आमची साथ देण्याची विनंती करत आहोत. यासह भारतातील प्रत्येक मुलाला त्याचा शिक्षणाचा हक्क आम्ही मिळवून देऊ शकू.” असेही श्रीमती लालवानी पुढे म्हणाल्या.

यासमयी, हाय स्ट्रीट फिनिक्सच्या विपणन विभागाचे प्रमुख श्री.ॲलेक्स कुटिन्हो म्हणाले, “पब्लिक स्कूल आणि झोपडपट्टयांमध्ये साक्षरता पसरवण्याच्या कार्यामध्ये लाईफ ट्रस्ट अतिशय वचनबद्ध आहे. हाय स्ट्रीट फिनिक्समधील आम्ही लाईफ ट्रस्टसोबत भागीदारी करून त्यांची क्षमता उभारण्यासाठी अतिशय आनंदी आहोत. सणासुदीच्या या दिवसात आमच्या खरेदीदारांसाठी ही एक आणखी संधी असेल. अतिशय विशेष पद्धतीने एवढया चांगल्या कार्यासाठी त्यांनाही हातभार लावता येईल.”

लाईफ ट्रस्टला पूर्ण विश्वास आहे की मुंबईचे नागरिक मोठया प्रमाणात पुढे येऊन या उपक्रमाला हातभार लावतील आणि आपली दिवाळी अतिशय वेगळया पद्धतीने साजरी करतील.

**लाईफ ट्रस्टबद्दल माहिती**

साल 2000 मध्ये चेन्नईत, लॅन्डमार्क इंटरनॅशनल फाऊंडेशन फॉर एम्पॉवरमेंट (लाईफ) ची सुरूवात एक नोंदणीकृत पब्किल चॅरिटेबल ट्रस्टच्या रूपात करण्यात आली. *‘स्कूल चलो’* ला भारतातील प्रत्येक मुलाचा मंत्र बनवण्याच्या दृष्टीकोनासह, लाईफ भारतातील सरकारी शाळा शिक्षण प्रणालीच्या उन्नतीसाठी अनेक ॲक्टिव्हिटीजचे आयोजन करतात. शिकण्यात अडथळे असलेल्या तसेच मानसिकदृष्टया आव्हान असलेल्या विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रमांची सुरूवात लाईफने केलेली आहे. मुंबई, चेन्नई आणि बेंगलोरमध्ये लाईफची उपस्थिती आहे आणि येत्या काही वर्षांमध्ये आपले अस्तित्व भारतभरात प्रस्थापित करण्याची यांची योजना आहे.

अन्य एन्जसीज् तसेच समान विचारधारा असलेल्या लोकांसह, कलात्मक आणि प्रभावी कार्यक्रमांच्या माध्यमातून, सर्वच हिस्सेदार आणि समाजाला सामिल करून पब्लिक स्कूल सिस्टमसोबत काम करणे तसेच

त्यांना समर्थन देणे हे लाईफचे मिशन आहे. केवळ 5 वर्षांच्या कालावधीमध्ये लाईफ ट्रस्टचा फायदा 1 लाखहून अधिक लोकांना झालेला आहे.

अधिक माहितीसाठी भेट द्या www.lifetrustindia.org

**आयसीडीएस् (इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्विसेस स्कीम) बद्दल माहिती:**

ग्रामीण, आदिवासी आणि झोपडपट्ट्यांमधील लहान मुलांच्या योग्य वाढ आणि विकासासाठी एकीकृत पद्धतीने प्रि-स्कूल मुलांना सेवा देण्याचे इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्विसेस प्रोग्रामचे ध्येय आहे. आयसीडीएस्ला केंद्राचे समर्थन आहे.

**लाईफ ट्रस्ट - इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट स्कीम / आंगणवाडया:**

9500 लहान मुले आणि 950 शिक्षक असलेल्या बांद्रा आणि धारावी झोपडपट्ट्यांमधील 475 आंगणवाडयांवर लाईफ ट्रस्टचे लक्ष आहे. हा ट्रस्ट अनेक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आणि कार्य शाळांचे आयोजन करतो. यात ह्या आंगणवाडयामधील अर्ली चाईल्डहूड केअर, क्लासरूम व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, पोषण, लहान मुलांचे हक्क आणि महिलांचे हक्क यांचा समावेश आहे. 2008-2009 साली यांचा टीचर्स ट्रेनिंग प्रोग्राम्स (टीटीपी) 3668 शिक्षकांपर्यंत पोहोचला. बांद्रा आणि धारावीमधील झोपडपट्ट्यांमधील 9500 लहान मुलांना या कार्यक्रमाचा फायदा झाला.

**अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा.**

**जय देसाई / हेमल शाह**

फोरसाईट कम्युनिकेशन्स

jay@foresightindia.in / hemal@foresightindia.in

+91 9820060107 / 9819597604